# २००८ - २००९ नवीन वर्षाची सुरवात

३१ मार्च २००८ संपायला केवळ काही दिवसच शिल्लक राहिलेले आहेत. पतसंस्थांमधील कार्यकर्ते व कर्मचारी यांनी जिवाचा अटापीटा करुन थकीत कर्जाची वसुली या महत्वाच्या मुद्दयावर परिश्रम घेतले असणार यात शंका नाही. आणि ह्याही व्यतिरिक्त भाग - भांडवल - ठेवीमध्ये वाढ, सी. डि. रेशो., तरलता, व्यवस्थापन इत्यादी तितक्याच महत्वाच्या बाबींवर निश्चितपणे लक्ष केंद्रीत केलेले असणार. आणि ३१ मार्च अखेरपर्यंतचा पतसंस्थेचा कारभार, सभासदांच्या ठेवींचे पुरेपुर संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी पुर्ण करण्याचे दायित्व पार पाडल्याचा आनंदही मिळविला असणार, यासारखी अभिमानाची गोष्ट दुसरी असू शकत नाही.

हे वर्ष संपले. आता नवीन वर्षाच्या वर्षाची सुरवात होणार आहे. १ एप्रिल २००८ पासून २००८-०९या आर्थिक वर्षाला सुरवात होत आहे. पतसंस्थांनी **१ एप्रिल हा या चळवळीतील शुभारंभाचा संकल्प सोडण्याचा व नियोजन करण्याचा दिवस घडवून आणण्याची गरज आहे**. प्रत्येक पतसंस्थेने १ एप्रिल २००८ रोजी मागच्या वर्षात काय-काय झाले व पुढील वर्षात काय - कसे व कोणी करायचे, या संदर्भात रितसर सभा लावून निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. आणि सभा अत्यंत आत्मविश्वासाने व जबाबदारीने यशस्वी करण्यासाठी पतसंस्थेच्या प्रत्येक संचालकाने व कर्मचाऱ्याने वेळेत सभेस उपस्थित राहून कामकाजाला सुरवात करायला पाहिजे.

१ एप्रिल २००८ मध्ये वरीलप्रमाणे घ्यावयाच्या सभेत सर्व साधारणपणे खालील महत्त्वाच्या विषयांबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

१. मागील आर्थिक वर्षातील थकबाकीदार कर्जदारांचा आढावा घेणे.

२. कर्जाचा पहिला हफ्ता, दुसरा हफ्ता व तिसरा हफ्ता थकित झाल्यानंतर करावयाच्या कारवाईच्या संदर्भात कालावधीसह चर्चा करून धोरणात्मक निर्णय घेणे.

३. कलम १०१ किंवा ९१ खाली थकित कर्ज वसुलीसाठी प्रलंबित प्रकरणाची माहिती घेऊन पुढील करावयाच्या कामकाजाबाबत निर्णय घेणे.

४. कलम १०१ किंवा ९१ खाली प्राप्त झालेल्या अवार्डच्या अंमलबजावणीची विद्यमान परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील कारवाईच्या तारखा व धोरण ठरविणे.

५. आठवड्यातील कामाच्या ६ दिवसांपैकी प्रत्येक संचालकाने पतसंस्थेच्या कार्यालयात कुठल्या दिवशी, कुठल्या वेळेत व किती तासासाठी येऊन दैनंदिन कामकाजात प्रत्यक्ष भाग घेण्यासाठी नैतिकता म्हणुन जबाबदारी घेणेविषयी निर्णय घेणे.

६. पतसंस्थेच्या मार्फत ह्या आर्थिक वर्षात कुठल्याही परिस्थितित देणग्या, जाहीराती, जेवणावळी, बॅनर, गेट इत्यादीच्या नावाखाली आवश्यकता नसताना खर्च करण्यावर पूर्णपणे निर्बंध आणण्याचा निर्णय घेणे.

७. ह्या आर्थिक वर्षाभरात ठेव वृध्दी किती व कोणी व कशी करायची यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेऊन त्यानुसार अंमलबजावणी करणे.

८. संचालक मंडळाची शक्य झाल्यास प्रत्येक महिन्याची एक निश्चित तारीख व वेळ कायम करणेसाठी सर्वांच्या सोईने सभेची तारीख ठरविणे.

९. ३ महिन्यातुन एकदा पतसंस्थेच्या झालेल्या थकबाकी वसुलीच्या बाबत केलेल्या कारवाईचा आढावा घेणे. व ठरलेल्या निर्णयानुसार त्याप्रमाणे जर कामकाज झाले नसेल तर त्याची कारणे व उपाय शोधून पुढील कारवाई करणे.

१०. प्रत्येक संचालक व कर्मचारी यांना संस्थेचे कर्जदार व जामीनदार (नियमित कर्जदार व थकबाकीदारासह) यांची सोईनुसार जबाबदारी विभागून प्रत्येक महिन्यास कर्जाचे हप्ते वसुल करणे किंवा वसुली करून घेणे ह्यास्तव कर्जदारांचे नाव, पत्ता, दुरध्वनी, मोबाईल इत्यादींसह कामाची विभागणी करुन देणे.

११. ह्या वर्षात संचालक व कर्मचाऱ्यांसाठी घ्यावयाचे प्रशिक्षण व सामाजिक बांधिलकी म्हणून संस्थेतर्फे करावयाच्या कामकाजाचे नियोजन करुन त्याची अंमलबजावणी करणे.

१२. संस्थेने किंवा संस्थेच्या विरोधात विविध न्यायालय व इतर ठिकाणी चालु असलेल्या दाव्यांच्या संदर्भात माहिती घेणे. त्या सर्व दाव्यांवर गेल्या वर्षात झालेल्या खर्चांचा आढावा घेऊन प्रत्येक प्रकरणांची सद्यस्थिती समजावुन घेऊन पुढील नियोजन करणे.

१३. ठेवीवरील व्याज व कर्जावरील व्याजाचे दर संदर्भात सर्व आर्थिक बाबींचा आढावा घेऊन पुढील नियोजन करणे.

१४. बाहेरुन कर्ज उभारण्याची मर्यादा (ठेवीसह) याबाबत त्या - त्या वेळी आढावा घेण्यासंदर्भात धोरण निश्चित करणे.

१५. कर्ज वाटपासाठी निधिची उपलब्धतता लक्षात घेऊनच मंजूर केलेल्या कर्जाचे वितरण करण्यासंदर्भात त्या - त्या वेळीच निर्णय घेण्याचे धोरण स्विकारणे.

१६. कार्यालय अनामत, टॅक्सेस, कर्मचारी संख्या व त्यांचे पगार, स्टेशनरी, प्रवास, छपाई, इंधन, टेलीफोन, लाईट व इतर वस्तुंसाठी खर्चा संदर्भात वर्षभरासाठी केलेल्या अंदाजपत्रकाचे प्रत्येक महिन्यास जसेच्या तसे पालन करण्याविषयी जागरूकपणे अंमलबजावणीसाठी धोरण आखणे

वर उल्लेखलेल्या व इतर अनेक गोष्टी १ एप्रिल २००८ रोजी संचालक व कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे विचार करून निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. येणारा १ रूपया व जाणारा १ रुपया याचे नियोजन मोघमपणे अंदाजपत्रकामध्ये केवळ करून भागणार नसुन त्याबाबत प्रत्येक महिन्याला त्याची किती परिपूर्णता झाली याविषयी आढावा घेणे आवश्यक आहे. वर्षभरात मुदत संपणाऱ्या ठेवी व त्यांच्या रकमा याबाबत जाणीवपूर्वक माहिती घेऊन त्यानुसार त्याची परिपूर्णता करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभी करणे आवश्यक असल्यामुळे, त्याबाबत महत्वाकांक्षी योजना आखुन त्यानुसार कामकाज करणे आवश्यक आहे.

एकंदरीत हे २००८ - २००९ आर्थिक वर्ष पतसंस्थांना नियोजनबध्द निर्णय व कामकाजामुळे वरदानच ठरावे अशीच आपली पूर्ण वर्षभरासाठी व्युह रचना असणे आवश्यक आहे.. आपला कारभार आपल्याच चौकटीत उपविधी व सहकार कायद्याला अधिन राहुन सुक्ष्मपणे व नियमितपणे करण्याची सवय कायम ठेवावी, जेणेकरुन पतसंस्थांना भविष्यकाळात धमकवण्याची, नाडण्याची किंवा हतबल करण्याचे धैर्य कोणीही करू शकणार नाही. याबाबत आपला निर्धार कायम ठेवला पाहिजे. म्हणून १ एप्रिल २००८ पासून येणाऱ्या ह्या आर्थिक वर्षाचा प्रत्येक दिवस आपण सभासद व ठेवीदार यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठीच खर्च करून व विश्वस्त म्हणुन तेवढ्याच अधिकाराने कोणालाही आपल्यावर आक्रमण करुन देणार नाही, हा दृढ संकल्प यानिमित्ताने करूया. नुतन आर्थिक वर्षासाठी शुभ चिंतुन सर्वांना अत्यंत जागरूकपणे, नियमितपणे व काटेकोरपणे काम करण्याची भुमिका यापुढेही कायम ठेवूया.

जय हिंद ! जय महाराष्ट्र ! जय सहकार !